
# Hindi Book Exhibition







Inauguration of Hindi book exhibition by

Prof. Dr. Najim Shekh

# Faculty visit






# Student visit





# Newspaper Cutting

## आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा येथे हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस' सप्ताह साजरा

**दै. वाळवा क्रांती** \ आष्टा

अरबी,फारसी, पोर्तुगीज राजवटी पासून ते थेट इंग्रजी राजवटीपर्यंत भारताची स्वतःची राजभाषा नव्हती. प्रदीर्घ काळापर्यंत सर्व व्यवहार परकीय भाषेमध्ये चालत होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १४ सप्टेंबर, १९४९ रोजी राजभाषा म्हणून हिंदीला प्रथमच संविधानिक दर्जा देण्यात आला. तेव्हापासून राजभाषा हिंदी मध्ये सर्व प्रशासकीय व्यवहार करण्याचे प्रावधान आहे. १९६५ पर्यंत हिंदी सोबत इंग्रजीतून व्यवहार करण्यास मुभा दिली गेली होती. १९६५ नंतर पूर्णतः राजभाषा हिंदीतूनच सर्व प्रशासकीय व्यवहार करणे निश्चित करण्यात आले. तरी देखील आजही सर्व प्रशासकीय व्यवहार राजभाषेमध्ये पूर्णपणे होताना दिसत नाहीत. इंग्रजी भाषेचे ज्ञान सर्वांसाठी आवश्यकच आहे, त्याबरोबरच इंग्रजीचा अनावश्यक वापर करून मातृभाषेचे, राष्ट्रभाषेचे अवमूल्यन करणे कदापी योग्य नाही. हिंदी जिवंत ठेवणे हे प्रत्येक हिंदी, मराठी भाषिकाचे कर्तव्य आहे. असे विचार प्रा. डॉ. नाजीम शेख यांनी मांडले.



आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा येथे हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस' सप्ताह कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. नाजीम शेख

ते आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा येथे हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस' सप्ताह कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, भाषेच्या माध्यमातून रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध आहेत. त्याकरिता विद्यार्थ्यांनी भाषेवर प्रचंड मेहनत घेणे गरजेचे आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर काम करून आजचे विद्यार्थी मीडिया, चित्रपट, गायन, लेखन, अनुवाद, जाहिरात, अभिनय इत्यादी क्षेत्रात आपले व्यक्तिमत्व विकसित करू शकतात. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी हिंदी च्या माध्यमातून रोजगाराच्या विपुल संधी प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी भाषेच्या माध्यमातून आपले करिअर करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात हिंदी ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विश्वास पाटील यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा. शैलजा टिळे यांनी करून दिला. प्रा. मनीषा कणसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थिनी कु. अश्विनी पाटील यांनी सुंदर ओघवत्या शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. सुनील पाटील, डॉ. पौर्णिमा चव्हाण, डॉ.शीला पाटील, प्रा. राजेंद्र प्रधान, प्रा. भीमसेन आवटी, प्रा.विनोद गायकवाड, डॉ. संतोष कावडे, प्रा. रूपाली निकम, प्रा. सुदर्शन पाटील, ग्रंथपाल प्रियांका बारपटे यांनी हिंदी दिवस सप्ताह कार्यक्रमाचे नियोजन केले. राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. हिंदी दिवस सप्ताह कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने 'साहित्यकार प्रेमचंद विशेषांका'चे प्रकाशन, 'हिंदी साहित्यकार' या विषयावरील चित्रकला स्पर्धा, हिंदी निबंध स्पर्धा, त्रिभाषा (मराठी हिंदी इंग्रजी) काव्य वाचन स्पर्धा असे वैविध्यपूर्ण उपक्रम दि. १४.०९. २४. ते १९. ०९. २४. या सप्ताहात घेण्यात आले. या सर्व उपक्रमांना महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या सर्वच उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील ज्युनिअर व सीनिअर विभागातील सर्व विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभागी होते.

---

सकाळ

## हिंदी भाषा जिवंत ठेवणे, हे आपले कर्तव्य

### डॉ. नाजीम शेख : आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजमध्ये व्याख्यान

**आष्टा, ता. २०** : हिंदी भाषा जिवंत ठेवणे हे प्रत्येक हिंदी, मराठी भाषिकाचे कर्तव्य आहे, असे विचार प्रा. डॉ. नाजीम शेख यांनी आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज येथे हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस' सप्ताह कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले.



**आष्टा** : हिंदी दिवस कार्यक्रमात बोलताना डॉ. नाजीम शेख. समवेत मान्यवर.

डॉ. शेख म्हणाले, "स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १४ सप्टेंबर १९४९ रोजी राजभाषा म्हणून हिंदीला प्रथमच संविधानिक दर्जा देण्यात आला. तेव्हापासून राजभाषा हिंदी मध्ये सर्व प्रशासकीय व्यवहार करण्याचे प्रावधान आहे. १९६५ पर्यंत हिंदी सोबत इंग्रजीतून व्यवहार करण्यास मुभा दिली गेली होती १९६५ नंतर पूर्णतः राजभाषा हिंदीतूनच सर्व प्रशासकीय व्यवहार करणे निश्चित करण्यात आले. तरी देखील आजही सर्व प्रशासकीय व्यवहार राजभाषेमध्ये पूर्णपणे होताना दिसत नाहीत."

कार्यक्रमाची सुरुवात हिंदी ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी हिंदीच्या माध्यमातून रोजगाराच्या विपुल संधी प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यावेळी डॉ. सुनील पाटील, डॉ. पौर्णिमा चव्हाण, डॉ. शीला पाटील, प्रा. राजेंद्र प्रधान, प्रा. भीमसेन आवटी, प्रा. विनोद गायकवाड, डॉ. संतोष कावडे, प्रा. रुपाली निकम, प्रा. सुदर्शन पाटील, ग्रंथपाल प्रियांका बारपटे व विद्यार्थी उपस्थित होते. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले प्रा. विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शैलजा टिळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. मनीषा कणसे यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
21/09/2024 Page No. 6